**रे.दि.मु.नं.१७२/१७ मधील निशाणी क.२६ खालील आदेश**

१) वादीने प्रस्तुतचे नि.२६ कडील अर्ज प्रतिवादी नं.२ श्री.विश्वास शिवाजी बर्गे यांचेविरुध्द दावा अपशम (Suit Abate) झाल्याचा आदेश रद्द करुन सदर प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर घेणे करीता झालेला ४ महिने १३ दिवसांचा झालेला विलंब माफ व्हावा यासाठी दाखल केलेला आहे.

२) सदर अर्जाचे थोडक्यात कथन असे की, सदर दाव्यातील प्रतिवादी नं.२ श्री.विश्वास शिवाजी बर्गे हे दिनांक ८/५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादींना प्रतिवादी नं.२ चा मृत्युचा दाखला, इतर कागदपत्र वारसांची नावे व त्यांचे पत्ते कोव्हीड–१९ चे जागतिक माहामारीमुळे मिळणेस उशिर झाला. सबब, वादीने प्रतिवादी नं.२ चे विरुध्द झालेला Abatement अपक्षम झाालेला आदेश रदृद होणेसाठी व प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलब माफ व्हावा अशी विनंती केली आहे. सदर प्रतिवादी नं.२चे वारस मुदतीत अभिलेखावर आणण्याची वादींनी हेतुपुर:सर टाळाटाळ केलेली नाही. सदर प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणल्यास त्यातून वादींचे काहीही नुकसान होणार नाही. प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर आणणे न्यायाचे दृष्टिने आवश्यक असून ते उभय पक्षकारांच्या हिताचेच होणार आहे. सबब प्रतिवादी नं.२ चे विरुध्द झालेला दावा अपशम वारस (Suit Abate) झालेला आदेश रदृद होवुन, वारस अभिलेखावर आणणेस झालेला ४ महिने १३ दिवसांचा विलंब माफ करुन त्यांचे वारस अभिलेखावर आणणेस वादींना परवानगी मिळावी अशी वादींनी शेवटी विनंती केली.

३) प्रतिवादीं यांनी या अर्जाकामी मुदतीत म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे त्यांचे म्हणणे नाही असे समजणेत येत आहे.

४) वादीचे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादींनी प्रस्तुत दावा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. दावा दाखल करतेसमयी वादींनी दाव्याकामी आवश्यक त्या सर्व पक्षकारांना सामील केले होते. तथापि दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी नं.२ यांचे निधन झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. प्रतिवादी नं.२ चे वारस वादींनी मुदतीत अभिलेखावर न आणल्यामुळे प्रस्तुत दावा सदर प्रतिवादी नं.२ विरुध्द अपशम करणेत आला आहे. मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणणेकामी वादींना ४ महिने १३

दिवसांचा विलंब झाला आहे. वादींना प्रतिवादी नं.२चा मृत्युचा दाखला वेळेत न मिळालेने वारस मुदतीत आणता आले नाहीत असे वादीचे कथन आहे. जरी कायदयाचे अज्ञान असणे ही बाब क्षम्य नसली तरी एकूण परिस्थिती पाहता, मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणणे न्यायोचित होणार आहे, कारण प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल करणेत आलेला आहे. दावा मिळकतीमधील प्रत्येक सह–हिस्सेदार दाव्यात सामील असणे व त्याचे हक्क निर्णयीत करणे न्यायाचे दृष्टिने आवश्यक आहे. मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेतलेस वादींचे काही एक नुकसान होणार नाही. याउलट तसे न केलेस मयत प्रतिवादींच्या वारसांचे दावा मिळकतीतील हक्क ठरविता येणार नाहीत. त्यामुळे प्रतिवादी नं.२ चे वारस अभिलेखावर घेतलेस ते उभय पक्षकारांच्या हिताचेच ठरेल. सबब प्रतिवादी नं.२ विरुध्द झालेला दावा अपशम हा आदेश रद्द करुन त्यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल व झालेला विलंब माफ केल्याने वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद कायमस्वरुपी संपुष्टात आणणेस त्याची निश्चितपणे मदतच होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. वादीचा नि.२६ वरील अर्ज मंजूर विलंब माफ करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.२विरुध्द झालेला दावा अपशम आदेश याद्वारे रद्द करणेत येत आहे.

फलटण. (एस.डी. साबळे)
दि.०४/०२/२०२२. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण